मंत्रालयीन विभागातील सह सचिव, उप सचिव यांना ठोक भरपाई मंजूर करणेबाबत

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांकः चवक - १०१३ /प्र.क्र. १७ /२०१३/सेवा- ३

खो.क्र.३३५ (विस्तार), तिसरा मजला, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: ११ सप्टेंबर, २०१९.

वाचा

१) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक: विअप्र १००५/प्र.क्र.१६/२००५/विनियम, दि.१४ जुलै, २००५
२) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक: विअप्र १००५/प्र.क्र.३९/२००५/विनियम, दि.२३ जानेवारी, २००६
३) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक: चवक१४१०/प्र.क्र.११/सेवा-३, दि.१२ ऑगष्ट, २०१०
४) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण १०१०/प्र.क्र.२१/सेवा-३, दि.१३ ऑक्टोबर, २०१०
५) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक: चवक-१०१३/प्र.क्र.१७/सेवा-३, दि.१० जुलै, २०१३

प्रस्तावना -

मंत्रालयातील सहसचिव व उपसचिव यांना वित्त विभागाच्या उपरोक्त दिनांक १० जुलै, २०१३ च्या शासन निर्णयान्वये संबंधित पदाच्या ग्रेड वेतनाएवढी रक्कम एकत्रित ठोक भरपाई रक्कम म्हणून मंजूर करण्यात आली आहे. सातवा वेतन आयोग लागू झाल्याच्या अनुषंगाने, सदर अधिकाऱ्यांच्या वेतनश्रेणी व वेतनामध्ये झालेल्या सुधारणा विचारात घेता, मंत्रालयीन विभागातील सह सचिव, उप सचिव यांना मंजूर करण्यात येणाऱ्या ठोक भरपाईच्या रकमेमध्ये सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव, शासनाच्या काही काळ विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

मंत्रालयात सहसचिव पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगानुसार सहसचिव पदाच्या Pay Matrix Level-S-२७ मधील Cell-१ च्या ११% एवढी एकत्रित रक्कम ठोक भरपाई म्हणून मंजूर करण्यात यावी.

मंत्रालयात उपसचिव पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगानुसार उपसचिव पदाच्या Pay Matrix Level-S-२५ मधील Cell-१ च्या १५% एवढी रक्कम ठोक भरपाई म्हणून मंजूर करण्यात यावी.

२. या ठोक भरपाईचा लाभ फक्त मंत्रालयीन विभागात कार्यरत असलेल्या सर्व सह सचिव, उपसचिव यांना अनुज्ञेय राहील. मंत्रालयातील उपरोक्त पदावर कार्यरत अधिकारी हे त्यांच्या बदलीनंतर मुंबई किंवा राज्यातील अन्य ठिकाणच्या पदावर गेल्यानंतर हा शासन निर्णय प्रतिपूर्तीसाठी

लागू राहणार नाही व त्यांना वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक १, २ व ३ च्या स्थायी आदेशानुसार लागू असलेली भरपाई अनुज्ञेय राहील. त्यांना या शासन निर्णयानुसार विहित केलेली भरपाई देय असणार नाही.

३. या आदेशाच्या परिणामी मंत्रालयात कार्यरत असलेल्या सह सचिव व उपसचिव यांना ते त्या पदावर कार्यरत असलेल्या कालावधीत सध्या दरमहा मिळणारा शहर पूरक भत्ता रु.३००/- ते त्या पदावर कार्यरत असेपर्यंत अनुज्ञेय राहणार नाही.

४. संबंधित अधिकाऱ्यांचे वेतन ज्या विभागातून काढण्यात येत असेल, त्या विभागाने ठोक भरपाई रक्कमेचे प्रतिपूर्ती देयक कोषागारात सादर करुन दरमहा अदा करण्यात यावे.

५. एका कॅलेंडर महिन्यापेक्षा जास्त असलेला रजेचा कालावधी, पदग्रहण अवधी, प्रतिनियुक्तीचा कालावधी, प्रशिक्षण कालावधी, सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी, निलंबन या कारणासाठीच्या कालावधीमध्ये सदर ठोक भरपाई अनुज्ञेय करण्यात येऊ नये व त्याकरिता या शासन निर्णयासोबत परिशिष्ट "अ" येथे विहित केलेले प्रमाणपत्र दरमहा प्रत्येक देयकासोबत सादर करणे अनिवार्य राहील. उपरोक्त बाबींच्या प्रतिपूर्तीसाठी दर तीन महिन्यातून एकदा आहरित करण्याबाबत उपरोक्त दिनांक १३/१०/२०१० च्या शासन निर्णयातील तरतूद रद्द करण्यात येत असून, उपरोक्त बाबींची भरपाई दरमहा करण्यात यावी. सदर कार्यपध्दती या शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या महिन्यापासून लागू करण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय वित्त विभागातील विनियम कार्यासनाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४०२/२०१९/विनियम, दि.०९.०९.२०१९ अन्वये मिळालेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१११८१२५२०८०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhalchandra Jagannath Gadekar

Digitally signed by Bhalchandra Jagannath Gadekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=93c75178c3c4e1daaeb069f4e437a48fd302aabd765450129e4447d5a1da1f2a, serialNumber=d2671e08dbf49e6a42b865d026c3f07bc1eb8254056eab8fa6b4b0fb72dd47ba, cn=Bhalchandra Jagannath Gadekar
Date: 2019.09.11 18:24:41 +05'30'

(भा.ज.गाडेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,

२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद / विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. सर्व सन्माननीय विधानसभा, विधान परिषद व संसद सदस्य
५. मंत्रालयीन सर्व विभाग
६. सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव मंत्रालय, मुंबई
७. सचिव, मा.सभापती, विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई
८. सचिव, मा.अध्यक्ष, विधान सभा, विधानमंडळ, मुंबई
९. सर्व मंत्री आणि राज्यमंत्र्यांचे स्वीय सहायक
१०.महालेखापाल, (लेखा परिक्षा) १ महाराष्ट्र, मुंबई
११.महालेखापाल , (लेखा व अनुज्ञेयता)१ महाराष्ट्र, मुंबई
१२.महालेखापाल, (लेखा परिक्षा) २ महाराष्ट्र, नागपूर
१३.महालेखापाल , (लेखा व अनुज्ञेयता) २ महाराष्ट्र, नागपूर
१४.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
१५.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१६.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१७.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१८. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
१९.बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई १
२०.भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं. १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक,नरिमन पॉईंट , मुंबई २०
२१.भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४,राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड,मुंबई ४
२२.भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई १३
२३.इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २५
२४.नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई २१
२५.शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई २८
२६.वित्त विभागातील सर्व कार्यासने
२७.निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-३)

परिशिष्ट "अ"

मंत्रालयीन विभागातील सहसचिव व उपसचिव यांना मिळणाऱ्या ठोक भरपाईची मागणी व त्याबाबतचे प्रमाणपत्र.

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक चवक-१०१३/प्र.क्र.१७/सेवा-३, दिनांक ०९/०९/२०१९ नुसार खालील कालावधीसाठी अनुज्ञेय असलेल्या ठोक भरपाईची रक्कम मला देण्यात यावी.

कालावधी	एकूण महिने
दिनांक------------ते दिनांक-----------	------ ------------------महिने

मी प्रमाणित करतो की, अनुज्ञेय नसलेला एका कॅलेंडर महिन्यापेक्षा जास्त असलेला रजेचा कालावधी, पदग्रहण अवधी, प्रतिनियुक्तीचा कालावधी, प्रशिक्षण कालावधी, सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी, निलंबन किंवा इतर कालावधी वरील कालावधीत समाविष्ट नाही.

दिनांक :

अधिकाऱ्यांची स्वाक्षरी :-

नाव :-

पदनाम :-

विभाग:-

प्रमाणित करण्यात येणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांची स्वाक्षरी:-

नाव व पदनाम

कार्यालयीन शिक्का